(सभापतीस्थानी माननीय सभापती)

<u>नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावासंबंधी</u>

सभापती : माझ्याकडे नियम 289 अन्वये 2 सूचना आलेल्या आहेत त्यामध्ये एक सूचना सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी दिलेली असून दुसरी सूचना सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, रामदास कदम, विनोद तावडे, डॉ. दीपक सावंत, सर्वश्री संजय केळकर, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री चंद्रकांत पाटील, परशुराम उपरकर यांनी दिलेली आहे. या दोन्ही सूचना जवळपास सारख्याच आहेत. त्यातील विषय म्हणजे अनुक्रमे "संपूर्ण राज्यामध्ये परतीच्या अवकाळी पावसामुळे व अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे पीक भिजून गेल्यामुळे त्यांचे झालेले नुकसान त्यामुळे नुकसानग्रस्त शेतकरी, बागायतदार व मच्छीमारांना योग्य ती आर्थिक मदत देण्याची आवश्यकता" असा आहे. आणि दुसऱ्या सूचनेत देखील त्याच पध्दतीचा विषय असून त्यातही असेच म्हटले आहे की, "माहे, जुलै-ऑगस्ट, 2010 मध्ये झालेल्या अतिवृष्टीने विदर्भ, खानदेश, कोकण, मराठवाडा तसेच माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर, 2010 मध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे धान, कापूस, सोयाबीन, ज्वारी, तीळ, भाजीपाला, फळे तसेच कोकणातील भातशेती व फळबागांचे झालेले नुकसान" असे हे दोन विषय आहेत. त्याचबरोबर मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, काल देखील याच विषयावर आधारित नियम 289 अन्वये तीन सूचना आल्या होत्या व त्या अनुषंगाने एक अपवाद म्हणून मी चर्चा सुध्दा जाहीर केली होती. तथापि ही चर्चा जाहीर करुन देखील केवळ आपल्या आग्रहामुळे सभागृहात त्या विषयावरील चर्चा होऊ शकली नाही. आज सुध्दा याच पध्दतीचे दोन विषय वेगवेगळ्या सन्माननीय सदस्यांनी दिले असून ज्याप्रमाणे काल या विषयाचे गांभीर्य स्पष्ट करण्यासाठी मी आपणास संधी दिली होती तशी संधी आज देण्याचे कारण नाही. आजच्या कामकाज पत्रिकेवर अवकाळी पावसाने झालेल्या नुकसानीसंबंधी नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा दाखविली आहे. म्हणून मी आजच्या नियम 289 अन्वयेच्या सूचनांना अनुमती नाकारीत आहे.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य एकाच वेळेस बोलत असतात)

कालच अशा प्रकारची चर्चा झालेली आहे आणि त्याच पध्दतीची आजची चर्चा असल्याने या दोन्ही सूचनांना नाकारण्याचा अधिकार सभापतींना आहे. कारण या अनुषंगाने काल या सभागृहात आपले म्हणणे मी पूर्णपणे ऐकलेले आहे. एक अपवाद म्हणून तसेच शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती .....

या ठिकाणी मी आपल्या विनंतीला मान देऊन नियम 97 अन्वये चर्चा मान्य केली होती. अशी चर्चा मान्य केल्यानंतर सुध्दा आपण आपल्या आग्रहास्तव ती चर्चा काल घेऊ शकलो नाही. नियम 289 अन्वये दिलेल्या आजच्या दोन्ही सूचना त्याच विषयावर आधारित आहेत.

श्री. विनोद तावडे : (गोंधळात बोलत असतात.)

सभापती : कालच आपले म्हणणे मी ऐकलेले आहे.....

श्री. दिवाकर रावते : शेतकऱ्यांच्या हितासाठी .....

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांच्या मी निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, शेतकऱ्यांची जेवढी कळकळ आपल्याला आहे तेवढीच मला सुध्दा आहे. म्हणूनच काल सभागृहात दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांच्या भावना समजून घेऊन एक विशेष बाब म्हणून मी चर्चा मान्य केली होती.....(अडथळा).....सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडेजी, आपले म्हणणे मी कालच ऐकलेले आहे. त्याच विषयावर आधारित आपले म्हणणे आजही असेल तर त्यासाठी मला परवानगी देता येणार नाही....

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधीपक्षाचे सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात.)

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मी काल दिलेल्या सूचनेमध्ये व आज दिलेल्या सूचनेमध्ये फरक आहे. दोन्ही सूचनांमध्ये फरक आहे. नियमांची पुस्तके आपण येथे कशासाठी ठेवलेली आहेत ?

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आम्ही सुध्दा जी सूचना दिलेली आहे त्यामध्ये सुध्दा फरक आहे. वाटले तर आपण शब्द रचना बघून घ्या.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आमचे म्हणणे ऐकून तरी घ्या.....

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, शेतक-याच्या विरोधात अधिकार वापरु नका अशी मी आपल्याला विनंती करतो.....

सभापती : हा तुमचा हेत्वारोप आहे. काल तुम्ही या सभागृहात शेतक-यांच्या संदर्भात जसे पोटतिडीकीने विचार मांडले होते त्याच पोटतिडीकीने सत्तारुढ पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी सुध्दा विचार मांडले होते. त्यामुळे सभागृहापुढील सर्व कामकाज तहकूब करुन अवकाळी पावसाच्या विषयावर नियम 97 अन्वये मी चर्चा करण्याचा अपवादात्मक निर्णय दिला होता. परंतु दुर्दैवाने अवकाळी पावसावर या सभागृहात काल चर्चा सुरु सुध्दा होऊ शकली नाही.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात.)

अशा परिस्थितीत सभागृहाचे कामकाज चालवणे शक्य होणार नसल्यामुळे मी सभागृहाचे कामकाज 10 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.07 वाजता 10 मिनिटांसाठी स्थगित करण्यात आली.)

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी)

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

तालिका सभापती : अशा गोंधळाच्या परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज चालविणे अशक्य असल्यामुळे मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 12 वाजून 17 मिनिटांनी 15 मिनिटांकरिता स्थगित झाली.)

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगिती नंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

सभापती : आज नियम 289 अन्वये जे दोन प्रस्ताव देण्यात आलेले आहेत त्या प्रस्तावाच्या अनुषंगाने या पूर्वी मी जरी निर्णय दिलेला असला तरी अपवाद म्हणून सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते आणि जयंत प्र. पाटील यांनी हा नियम 289 चा प्रस्ताव कसा होऊ शकतो या अनुषंगाने चार चार मिनिटांमध्ये त्यांचे मत मांडावे असे मी त्यांना सांगू इच्छितो.

श्री. पांडुरंग फुंडकर : माननीय सभापती महोदय, काल आम्ही नियम 289 अन्वये प्रस्ताव दिला होता परंतु काल तो प्रस्ताव मान्य होऊ शकला नाही . आज पुन्हा नियम 289 अन्वये प्रस्ताव देण्यामागचे कारण असे आहे की,.....

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

दरवर्षी पावसाळा सुरु झाल्यानंतर राज्यामध्ये सरासरीप्रमाणे जेवढा पाऊस पडतो त्यापेक्षा यावर्षी दीड पट ते दुप्पट पाऊस सर्व जिल्हयांमध्ये पडला. महाराष्ट्रातील जवळपास 26-27 जिल्हयामध्ये पावसाने थैमान घातले. एकेका दिवशी 65 मि.मी. पेक्षा जास्त पाऊस पडला. त्यामुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची शेती उद्ध्वस्त झाली. अनेक जिल्हयांमध्ये नद्यांना महापूर आले, त्यामध्ये माणसे व जनावरे वाहून गेली. विदर्भामध्ये अंगावर वीज पडल्यामुळे जवळपास 40 माणसे मरण पावली. शेतकऱ्याच्या शेतामधील पीक उद्ध्वस्त झाले.

सभापती महोदय, एकीकडे शेतकऱ्याची शेती उद्ध्वस्त होत असतांना दुसरीकडे त्याच्या विहिरीमध्ये पाणी आहे म्हणून रब्बीचे पिक घेण्यासाठी त्याने आपल्या शेतीची मशागत केली. परंतु रब्बीचे पिक घ्यावयाचे असेल तर त्याला आपल्या शेतीला विहिरीचे पाणी द्यावे लागते. ते सुध्दा विहिरीवर बसविण्यात आलेल्या पंपाव्दारे द्यावे लागते. परंतु महाराष्ट्रातील लाखो शेतकऱ्यांच्या कृषी पंपाच्या वीजेचे कनेक्शन वीज मंडळाने गेल्या दीड महिन्यात तोडून टाकले. आत्महत्त्याग्रस्त असलेल्या विदर्भातील सहा जिल्हयामधील शेतकऱ्यांचे जवळपास सव्वा लाख वीजेचे कनेक्शन तोडण्यात आले. अतिवृष्टीमुळे या शेतकऱ्याचे खरीपाचे पिक वाया गेले असतांना रब्बीचे पिक सुध्दा वाया जाणार या विवंचनेत शेतकरी आहे. अशा परिस्थितीत महाराष्ट्राची उपराजधानी असलेल्या नागपूर जिल्हयामध्ये हे अधिवेशन होत आहे. मी काल माझ्या प्रस्तावासंबंधी भाषण करीत असतांना म्हटले होते की, शासनाने अगोदर घोषणा करावी. माझ्या म्हणण्याचा अर्थ असा होता की, शासनाने अगोदर धोरण जाहीर करावे. आम्ही प्रस्तावावरील चर्चा अमान्य केलेली नाही. ज्याप्रमाणे सत्ताधारी पक्ष चर्चा करण्यास तयार आहे, त्याप्रमाणे आम्ही देखील तयार आहोत. परंतु अगोदर शासनाने धोरण जाहीर करावे, व त्यानंतरच आम्ही चर्चेला सुरुवात करु. त्या चर्चेमध्ये अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे कशाप्रकारे नुकसान झाले आहे हे आम्ही या सभागृहामध्ये मांडू असे सांगितल्यानंतर सुध्दा सत्ताधारी पक्ष धोरण जाहीर करण्यास तयार झाले नाही.

सभापती महोदय, या विदर्भाच्या भूमीमध्ये जेव्हा जेव्हा अधिवेशने झाली त्याबाबतची सहा ते सात उदाहरणे याठिकाणी सांगता येतील. या विदर्भामध्ये विरोधी पक्षांनी मोठ मोठी आंदोलने जाहीर केल्यानंतर या विदर्भामध्ये विधीमंडळाचे अधिवेशन सुरु होण्यापूर्वी या सरकारने घोषणा केल्याची अनेक उदाहरणे आपल्याला सांगता येतील. त्यामुळे शासनाने धोरण जाहीर करावे अशाप्रकारची मागणी आम्ही केली आहे, ती चुकीची नाही. या विदर्भामध्ये यापूर्वी अनेक वेळा पॅकेज

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/

श्री. पांडुरंग फुंडकर...

जाहीर करण्यात आले, परंतु त्याचे नीटपणे वाटप करण्यात आले नाही. विदर्भातील पूरग्रस्तांना मदत जाहीर करण्यात आली, फयान वादळामुळे झालेल्या नुकसानीनंतर मदत जाहीर करण्यात आली परंतु ती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचली नाही. त्याचवेळी शेतकऱ्यांना मदत देत असतांना त्यांची क्रूर थट्टा करण्याचा प्रयत्न या सरकारच्या माध्यमातून करण्यात आला. विदर्भातील बुलढाणा जिल्हयातील एका शेतकऱ्याला फक्त 5 रुपयांचा चेक दिला गेला. त्यामुळे आम्ही यावेळी असे ठरविले की, आपण हेक्टरी किती नुकसान भरपाई देणार आहात हे जाहीर करा. ज्यांच्या अंगावर वीज पडली त्यांना आपण कोणती मदत देणार आहात, ज्यांची जनावरे पूरामध्ये वाहून गेली आहेत त्यांना कोणती मदत देणार आहात यासंबंधीचे धोरण आपण जाहीर करा. या विदर्भातील ज्या शेतकऱ्यांचे वीजेचे कनेक्शन तोडण्यात आले आहे त्या संदर्भात सांगू इच्छितो की, या राज्यातील एका सिंचन सोसायटीकडे 2200 कोटी रुपयांची वीजेची थकबाकी असतांनाही त्यांचे वीजेचे कनेक्शन तोडण्याची सरकारची हिंमत होत नाही. आणि दुसऱ्या बाजूला लाखो शेतकऱ्यांकडे 500 ते 600 कोटी रुपयांची वीजेची थकबाकी आहे, म्हणून त्यांचे वीजेचे कनेक्शन तोडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याकरीता संकटामध्ये सापडलेल्या या सर्व शेतकऱ्यांच्या वीजेचे कनेक्शन ताबडतोब जोडण्याची आपण घोषणा करावी अशाप्रकारची आमची जुजबी मागणी आहे.

सभापती महोदय, आम्ही या प्रस्तावावर आता सुध्दा चर्चा सुरु करण्यास तयार आहोत. परंतु आम्ही वीजेचे कनेक्शन जोडून देवू असे माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सांगितले पाहिजे. अवकाळी पावसामुळे शेतकरी उद्ध्वस्त झाला आहे, तो संकटात सापडला आहे हे माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्र्यांनी मान्य केले आहे. आणि हे मान्य केल्यानंतर त्या शेतकऱ्याला मदतीचा हात देण्याकरिता धोरण ठरविण्याची गरज आहे. या निमित्ताने आपण शेतकऱ्यांचे तोडलेले वीजेचे कनेक्शन जोडण्याची घोषणा केली तर एक चांगला मेसेज त्या शेतकऱ्यांपर्यंत जाऊ शकतो. म्हणून माझी आग्रहाची विनंती आहे की, सरकारने यासंबंधी धोरण जाहीर करावे व त्यानंतर सभागृहामध्ये या प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात करावी. या प्रस्तावावर सभागृहामध्ये सविस्तरपणे चर्चा झाली पाहिजे अशाप्रकारची मागणी मी यानिमित्ताने करतो.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

हा प्रस्ताव नियम 289 अन्वये यासाठी घेता येऊ शकतो की, यापूर्वी राज्यामध्ये ज्या-ज्या वेळी महापूर आलेला आहे, त्यावेळी त्या विषयाच्या अनुषंगाने देण्यात आलेल्या स्थगन प्रस्तावाच्या सूचना मान्य झाल्या आहेत आणि हा प्रस्ताव देखील त्याच पध्दतीचा आहे, त्यामुळे आपण या प्रस्तावास मान्यता द्यावी अशी मी विनंती करतो.

. . . .एफ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण आम्हाला नियम 289 अन्वये देण्यात आलेल्या प्रस्तावाच्या समर्थनार्थ बोलण्याची संधी दिली, त्याबद्दल प्रथम मी आपल्याला धन्यवाद देतो. सदरहू विषय हा आमचा, तुमचा आणि येथे बसलेल्या सर्व सन्माननीय सदस्यांचा, सर्वसामान्य शेतकऱ्यांचा आहे, आपल्या सर्वांचाच आहे. त्यामुळे विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य ओरडत आहेत म्हणून तुम्ही आमच्या विरोधात ओरडलेच पाहिजे अशी भूमिका घेण्याचा हा विषय नाही. इतर सन्माननीय सदस्य सोडून, बाकीचे सर्व सन्माननीय सदस्य सरकारच्या विरोधात आपली जी भूमिका आहे, ती मांडू शकतात. आमची मागणी ठाम आहे की, प्रथम सरकारने असे धोरण जाहीर करावे की, शेतकऱ्यांना 25 हजार रुपये आणि बागायतदारांना 50 हजार रुपये मदत देण्यात येईल. याचे कारण असे आहे की, आमचा याबाबतीतील आतापर्यंतचा अनुभव गंभीर आहे.

सभापती महोदय, परवा मी नागपूरला आल्यानंतर मोहोदा येथे गेलो होतो, त्यावेळी रात्री 9.00 वाजता पाच हजार शेतकरी आमची वाट पहात होते. तेथे धान परिषद भरलेली होती. तसेच मी काल यवतमाळ मध्येही गेलो होतो, तेव्हा देखील तेथे कधी नव्हे एवढे 50 हजार शेतकरी जमा झाले होते. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांच्याकडे कदाचित याबाबतचा रिपोर्ट देखील आला असेल. आज राज्यातील शेतकरी एवढे चिडलेले आहेत. कारण त्यांनी काल असे सांगितले की, जोपर्यंत आमच्या मागण्या मान्य होत नाहीत, तोपर्यंत आम्ही घरी जाणार नाही. अशा वेळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन माझ्या सारख्या नेतृत्वाला याबाबत विचार करावा लागतो आणि त्यानुसार निर्णय घ्यावा लागतो. जेव्हा आम्ही अशा प्रकारे चिडलेल्या शेतकऱ्यांची भूमिका येथे मांडत असतो, त्यावेळी आम्ही मागील अनुभव लक्षात घेऊन भूमिका मांडत असतो. आदरणीय श्री.माणिकराव ठाकरे आपण याबाबतीत उभे राहून सांगितले तर आम्ही चर्चा देखील थांबवितो.पण प्रत्यक्षात गेल्या वेळेस लाल्या रोगामुळे पिकाचे जे नुकसान झालेले आहे, त्यासंबंधातील पैसे देखील अजूनपर्यंत तुमच्या भागातील शेतकऱ्यांना मिळालेले नाहीत. जी घोषणा करण्यात आली आहे, त्याचे पैसे मिळत नाहीत. अशा वेळेला आतापर्यंत आम्ही आपल्या माध्यमातून अनेक वेळा चर्चा केल्या आणि मग सरकारच्या वतीने माननीय मंत्री महोदयांनी उभे राहून उत्तर द्यावयाचे की, अमुक करतो, तमुक करतो. मग अधिवेशन संपते. मात्र त्यानंतर प्रशासनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांची जी ससेहोलपट होते, ती बाब अत्यंत गंभीर आहे. याठिकाणी कोकणाच्या संदर्भात चर्चा होईल, त्यावेळी आपल्या लक्षात येईल की, तेथील शेतकऱ्यांना गुंठ्याला 10 रुपये दिले. जर

. . . .एफ-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशा प्रकारे सरकारकडून शेतकऱ्यांची थट्टा होणार असेल तर याबाबतीत आमच्या समोर सरकारकडून काही ठोस भूमिका आली पाहिजे अशी आमची मागणी आहे. म्हणून आम्ही शासनाला सांगत आहोत की, सरकारने याबाबतीत आपली भूमिका मांडावी. त्यानंतर तुमच्या भूमिकेमध्ये ज्या उणीवा असतील त्या आम्ही चर्चेच्या माध्यमातून मांडू. सरकारची शेतकऱ्यांच्या संबंधातील भूमिका अयोग्य असेल तर ती सुधारण्यासाठी सुध्दा आमच्या चर्चेच्या माध्यमातून मदत होईल, सदनाला मदत होईल. म्हणून सर्वप्रथम सरकारने या बाबतीत आपली भूमिका मांडली पाहिजे यासाठी आम्ही आमची आग्रही मागणी करीत आहोत. या विषयाच्या संदर्भात चर्चा होण्यापूर्वी मी आपल्या माध्यमातून शासनाला पुन्हा-पुन्हा सांगत आहे की, आजही आमचे माननीय डॉ.पतंगराव कदम हे पुनर्वसन विभागाचे माननीय मंत्री आहेत. अशा वेळी त्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती निर्माण झाली पाहिजे. पण अजून ती समितीच अस्तिवात नाही. तेव्हा सरकार कोणते धोरण . . . .

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सदरहू प्रस्ताव नियम 289 अन्वये चर्चेसाठी कसा घेता येऊ शकतो एवढया मर्यादित विषयाबाबत सांगावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण दोन मिनिटांचा वेळ दिला.मी केवळ 1 मिनिट 22 सेकंद बोललो आहे. धन्यवाद.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.काल सदनामध्ये जेव्हा प्रश्नोत्तराचा तास सुरु झाला,तेव्हा याठिकाणी सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना मांडली की,सदनामध्ये या विषयाच्या बाबतीत चर्चा व्हावयास पाहिजे. सभापती महोदय, काल आपण यासंदर्भात निर्णय दिला होता की, मी वेगळया नियमांतर्गत या विषयाच्या संबंधातील चर्चा सुरु करण्यासाठी परवानगी देत आहे.त्याप्रमाणे आपण चर्चा करावी. त्यानंतर आज सुध्दा त्यांनी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना मांडली.नियमाप्रमाणे त्यांना चर्चा सुरु करु द्यावयाची की नाही याबाबत आपण निर्णय घेणार आहात.परंतु या अनुषंगाने सुरुवातीला चर्चा करावयाची आणि एवढया महत्वाच्या विषयावर केवळ दोन-तीन लोकांनीच बोलावयाचे. त्यानंतर चर्चा करावयाची नाही आणि कुठेतरी सभागृहातून सभात्याग करावयाचा किंवा सभागृहामध्ये गोंधळ घालून कामकाज बंद करावयाचे म्हणजे दुसऱ्या सन्माननीय सदस्यांवर अन्याय केल्यासारखे होईल. हा अत्यंत महत्वाचा विषय आहे आणि केवळ विदर्भातील शेतकऱ्यांचा नाही तर

. . . .एफ-3

श्री.माणिकराव ठाकरे . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा प्रश्न आहे.त्यामुळे सदनामध्ये या प्रश्नाच्या संदर्भात सविस्तर चर्चा होणे गरजेचे आहे.परंतु ती चर्चा टाळणे आणि ठराविक दोन-तीन लोकांनी त्यामध्ये चर्चेच्या स्वरुपात भाग घ्यावयाचा आणि नियम 289 अन्वये हा प्रस्ताव चर्चेसाठी कसा घेता येऊ शकतो हे सांगत असताना, त्यातून आपले फक्त भागवून घ्यावयाचे अशा प्रकारचा प्रयत्न सदनामध्ये सुरु आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे....

यासंदर्भात सदनाच्या सर्व सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन सभापती महोदय, आपण चर्चेला सुरुवात केली पाहिजे. तसेच माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी सुध्दा सभापती महोदय, आपण चर्चेला सुरुवात करावी असे सांगावयास पाहिजे. या ठिकाणी चर्चेची मागणी करण्यात येत असताना ठराविक लोकांनीच चर्चा करायची आणि सदनामध्ये नंतर त्यासंबंधीची चर्चाच होऊ नये अशा प्रकारची भूमिका घेऊन विरोधी पक्ष सभागृहासमोर येणार असेल तर हा या सदनाचा अव्हेर आहे. तेव्हा सभापती महोदय, आपण या संदर्भातील निर्णय दिला पाहिजे आणि ती चर्चा सुरु केली पाहिजे अशी माझी विनंती आहे.

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी या ठिकाणी जो पॉईंट ऑफ ऑर्डर उपस्थित केला आहे.....

सभापती : आपला हरकतीचा मुद्दा आहे काय?

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, या ठिकाणी विरोधी पक्षातील तीन सन्माननीय सदस्यांनी नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने बोलावयाला सुरुवात केली. आमचे म्हणणे एवढेच आहे की, शासनाचे धोरण काय असावे याबाबतची चर्चा सदनातील दोन्ही बाजूकडील सन्माननीय सदस्यांनी करण्याची आवश्यकता आहे. या चर्चेच्या माध्यमातून शासनाला त्यासंबंधीचे धोरण ठरविता येईल आणि या विषयाला जास्त न्याय मिळू शकेल. तसेच लोकशाहीची प्रक्रिया खऱ्या अर्थाने पाळली जाईल एवढेच मला या ठिकाणी सांगावयाचे आहे.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे आणि सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी या ठिकाणी जो हरकतीचा मुद्दा मांडला त्यामध्ये त्यांचे असे म्हणणे आहे की, कालच्या कामकाजामध्ये नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेच्या अनुषंगाने विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांनी तसेच सत्तारुढ पक्षातील सन्माननीय सदस्यांनी चर्चा केली. सन्माननीय विरोधी पक्षाची मागणी अशी होती की, अचानक पडलेल्या पावसामुळे महाराष्ट्रात ओला दुष्काळ निर्माण झालेला आहे. शेतकऱ्यांचे फार मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. त्या अनुषंगाने या सभागृहाचे आजचे इतर सर्व कामकाज बाजूला ठेवून या प्रस्तावावर चर्चा करण्यात यावी असे जसे विरोधी पक्षांचे म्हणणे होते तसेच सत्ताधारी पक्षातील सर्व सन्माननीय सदस्यांचे देखील म्हणणे होते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती....

म्हणून एका अपवादात्मक परिस्थितीत काल मी ही चर्चा मान्य केली आणि नियम 97 अन्वये चर्चेला परवानगी देण्याचे ठरविले व कालच्या कामकाज पत्रिकेवरील सर्व कामकाज बाजूला ठेवले. त्यानंतरही ती चर्चा झालीच नाही. त्याअनुषंगाने सन्माननीय सदस्यांनी शंका व्यक्त केलेली आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या सदनामध्ये ज्या प्रथा, परंपरा, पध्दती आणि नियम आहेत त्याप्रमाणे या सभागृहाचे कामकाज चालते. या सदनामध्ये नियम 289 अन्वये देण्यात आलेल्या प्रस्तावाच्या सूचनेच्या संदर्भात चर्चा सुरु होती. नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावावर चर्चा सुरु झालेली नव्हती. ज्या सन्माननीय सदस्यांनी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे त्यांनी दोन मिनिटात आपले म्हणणे मांडल्यानंतर माननीय सभापती त्या संदर्भातील आपली भूमिका तयार करुन निर्णय देतात अशा प्रकारची पध्दत आहे. सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे हे मंत्री होते. तसेच ते जुने सदस्य आहेत. तरी सुध्दा त्यांनी विरोधी पक्षातील तीन सदस्य बोलले आणि सत्ताधारी पक्षातील एकही सदस्य बोलला नाही आणि ही चर्चा संपली अशा प्रकारची भूमिका मांडली. आपण त्याचवेळेला भाषण करणाऱ्या सदस्यांना थांबवायला पाहिजे होते. सभापती महोदय,या सदनाच्या नियमांची माहिती असताना सुध्दा माहिती नसल्यासारखे वक्तव्य करणे आणि कुठेतरी आक्षेप घेणे हे योग्य होणार नाही. सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्य विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांपेक्षा जास्त बोलतात आणि हे सरकार किती नालायक आहे हे सांगण्याचा प्रयत्न करतात. सभापती महोदय, सत्ताधारी पक्षातीलच सन्माननीय सदस्य अशा प्रकारची भूमिका मांडतात म्हणून आम्हाला आनंद होतो.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी उच्चारलेला 'नालायक' हा शब्द त्यांनी मागे घ्यावा.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी तो शब्द परत घेतो.

(काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

सभापती : मी तो शब्द सन्माननीय सदस्यांना मागे घ्यावयास सांगितला आहे.

(काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी ज्या वेळेला असे म्हटले की, मी तो शब्द मागे घेतो. त्याच वेळेला काही सन्माननीय सदस्य सभागृहात उठून उभे राहिले. त्यामध्ये सन्माननीय सदस्या ॲड. उषाताई दराडे सुध्दा उठून उभ्या राहिल्या. मला फार अभिमान वाटला की, सन्माननीय सदस्या उषाताई दराडे या ॲडव्होकेट असताना सुध्दा सभागृहात उभ्या राहिल्या. म्हणून मला त्यांना सांगावयाचे आहे की "नालायक" असे म्हणणे ही शिवी नाही असा न्यायालयाने निर्णय दिला आहे. (गोंधळ) तरी सुध्दा मी माझे शब्द मागे घेतो.

यानंतर श्री. बरवड.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या चर्चेच्या अनुषंगाने या ठिकाणी आपले मत व्यक्त करीत असताना सरकारबद्दल 'नालायक' असा नको तो शब्द वापरला. त्यावर सत्ताधारी पक्षातील कोणीही सन्माननीय सदस्य विरोधी पक्ष नेते किती नालायक आहेत किंवा ते काम करण्यासाठी योग्य नाहीत असे म्हणत नाही. तेवढे तारतम्य सत्ताधारी पक्षातील सदस्य बाळगतात.

सभापती : दोन्ही सन्माननीय सदस्यांच्या वक्तव्यातील 'नालायक' शब्द मी कामकाजातून काढून टाकत आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांना विनंती करावयाची आहे की, या सभागृहामध्ये सरकारचे वेगळे अस्तित्व आहे. यामध्ये काँग्रेस पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, शिवसेना, भारतीय जनता पक्ष हे वेगळे आहेत. आपण स्वत: सरकार म्हणून वागू नका. आपण मंत्री व्हा.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, काल मी नियम 289 अन्वये प्रस्ताव दिला होता आणि आज सुध्दा नियम 289 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे. माननीय उपमुख्यमंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. माननीय उपमुख्यमंत्र्यांनी टी.व्ही.वर अशी मुलाखत दिली की, आम्ही सर्व राज्याची पाहणी केलेली आहे आणि पाहणीमध्ये किती नुकसान झाले, काय झाले याचा आम्ही अंदाज घेतलेला आहे आणि योग्य वेळी आम्ही ताबडतोब शेतकऱ्यांना मदत देण्याची प्रक्रिया सुरु करणार आहोत. सभापती महोदय, राज्याचे माननीय कृषी मंत्री श्री. राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सांगितले की, शेतकऱ्यांना नुकसान भरपाई लवकरच देण्यात येईल. राज्यात 10 लाख हेक्टरपर्यंत शेतीचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. माननीय उपमुख्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, या राज्याचे माननीय कृषी मंत्री असे बोलतात. त्यामुळे माननीय मंत्रिमहोदय जनतेला जी माहिती देतात ती सभागृहात समजण्याचा अधिकार कायद्याने आम्हाला दिलेला आहे.

सभापती : हा प्रस्ताव नियम 289 मध्ये कसा बसतो एवढ्या पुरते सन्माननीय सदस्यांनी बोलावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, या ठिकाणी आमची आग्रही मागणी आहे. शासनाला याचे पूर्ण ज्ञान आहे, शासनाला पूर्ण माहिती आहे. त्यामुळे या ठिकाणी चर्चा होण्यापूर्वी शासनाने घोषणा करावी. माननीय उपमुख्यमंत्री धडाडीचे आहेत. त्यांच्याकडे अर्थ खाते सुध्दा आहे. त्यामुळे ते तरतूद सुध्दा करु शकतात. त्यामुळे त्यांनी या ठिकाणी फक्त घोषणा करावी. त्यांनी सरकारच्या वतीने या ठिकाणी सांगावे की, आम्ही शेतकऱ्यांना अमुकअमुक मदत करण्यास तयार आहोत. त्यानंतर आम्ही चर्चेला सुरुवात करु.

श्री. सय्यद जमा : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, या सभागृहामध्ये सन्माननीय सदस्य बोलत असताना हरकतीच्या मुद्दयाच्या बाबतीत अनेक वेळा आपण सांगतो की, सन्माननीय सदस्यांचे बोलणे पूर्ण होऊ द्यावे.

सभापती : आपण प्रश्नोत्तराच्या तासामध्ये हरकतीचा मुद्दा उपस्थित करण्यास परवानगी देत नाही.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मी माझे विचार मांडत असताना अशा पध्दतीने विचार मांडण्यापासून थांबविणे बरोबर नाही. माननीय उपमुख्यमंत्री यांना सांगू इच्छितो की, आपण अर्थमंत्री म्हणून हे करणार नाही. मी एकाच जिल्ह्याची माहिती सांगणार आहे. गेल्या वर्षी रायगड जिल्ह्यामध्ये...

श्री. विनायक मेटे : ही काही चर्चा नाही...

श्री. जयंत प्र. पाटील : ते मला समजते.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी कृपया खाली बसावे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांना आपण बोलू द्यावे.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांना मी सांगू इच्छितो की, आज आपण नियम 289 अन्वये जो प्रस्ताव दिलेला आहे तो या नियमामध्ये कसा बसतो एवढया मर्यादेपर्यंत बोलण्यासाठी मी आपल्याला परवानगी दिलेली आहे. आजच्या कामकाजपत्रिकेवर अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीसंबंधीची अल्पकालीन चर्चा दर्शविलेली आहे. त्यावेळी आपल्याला सविस्तरपणे बोलता येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मागील वेळी अशाच प्रकारची चर्चा झाली होती. परंतु त्यावेळी शासनाने इतकी तुटपुंजी आर्थिक तरतूद केली की, शेतकऱ्यांना शासनाने देऊ केलेली मदत शेतकरी घेण्यास तयार नव्हते. तत्कालीन सन्माननीय अर्थमंत्र्यांनी जाहीर केलेली 3 कोटी रुपयांची मदत रायगड जिल्हयातील बँकेत पडून आहे. अशा प्रकारची तरतूद यावेळी शासन करणार असेल किंवा मदत करणार असेल तर आम्हाला या विषयावर चर्चा करावयाची नाही, वांझोटी चर्चा आम्हाला करावयाची नाही असे आमचे म्हणणे आहे.

श्री सय्यद जमा : सभापति महोदय, मेरा पॉइंट ऑफ आर्डर है. मेरा कहना है कि नियम 289 के अंतर्गत जो प्रस्ताव यहां पर चर्चा के लिए दिया गया है. उस प्रस्ताव पर चर्चा होनी चाहिए या नहीं, इस बारे में अपने विचार रखने का मौका आपने माननीय सदस्यों को दिया है. कल भी यहां पर इस बारे में चर्चा हुई थी. हमारी पार्टी की भी यही भावना है कि किसानों को मुआवजा मिलना चाहिए. जब यह प्रस्ताव आपने एडमिट किया तो मुख्यमंत्री महोदय और उप मुख्यमंत्री महोदय ने .....(गोंधळ) मेरा पॉइंट ऑफ आर्डर है, कृपया आप मुझे बोलने दीजिए... (गोंधळ) पहले आप सुनिए. आप कुछ भी बोलें और हम बिल्कुल भी न बोलें, यह बात कहां तक ठीक है ? कृपया आप मुझे अपनी बात कहने दीजिए.

.. 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

सभापति : आप अपनी बात जारी रखिए.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय,.....

सभापति : सन्माननीय सदस्य श्री जैनुद्दीन जी कृपया आप बैठ जाइए.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

श्री सय्यद जमा : सभापति महोदय, मेरा पॉइंट ऑफ आर्डर यह है कि यहां पर नियम 289 के अंदर लिखा है कि, "Any member..." इसका मतलब है कि सभी लोगों को अपनी बात कहने का हक है. हमारा कहना है कि नियम 289 के अंतर्गत होने वाली चर्चा पर हम सभी माननीय सदस्य बोलना चाहते हैं. It is not the monopoly of Opposition Party Members only. It is for all the Members.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, कालपासून नागपूर येथे हिवाळी अधिवेशन सुरु झालेले आहे. काल देखील सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील आणि अन्य काही सन्माननीय सदस्यांनी अवकाळी पावसासंबंधी नियम 289 अन्वये प्रस्ताव देऊन कामकाजपत्रिकेवरील कामकाज स्थगित करुन चर्चा सुरु करण्याची मागणी केली होती. परंतु काल त्यावर चर्चा होऊ शकली नाही. सभापती महोदय, मी आपल्यामार्फत सभागृहाला व राज्यातील जनतेला सांगू इच्छितो की, या विषयावर चर्चा करण्याची राज्य सरकारची तयारी आहे. आजही पुन्हा तीच चर्चा सुरु झालेली आहे. त्यामध्ये काही सन्माननीय सदस्यांनी उपयुक्त सूचना मांडल्या आहेत. सरकारने अशाप्रकारच्या नैसर्गिक आपत्तीसाठी शेतकऱ्यांना वेळोवेळी मदत केलेली आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेते आणि त्यांच्या सर्व सहका-यांचे असे म्हणणे आहे की, शासनाने याबाबत प्रथम घोषणा करावी. सभापती महोदय, आपण सुध्दा या राज्याच्या मंत्रिमंडळात वरिष्ठ मंत्री म्हणून काम केलेले आहे. इतर मान्यवरांनी केलेले आहे व समोर बसलेल्या आमच्या सहका-यांनी सुध्दा काम केलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांना मी सांगू इच्छितो की, मीडियासमोर मुलाखत देत असताना सरकारने आपली भूमिका जनतेसमोर मांडलेली आहे.

यानंतर श्री.शिगम

अशुद्धलिखित प्रत / मुद्रणेतर साठी नाही

श्री. अजित पवार....

राज्याचे कृषी मंत्री श्री. राधाकृष्ण विखे-पाटील यांनी राज्यामध्ये विविध ठिकाणी दौरे करुन शेतीच्या झालेल्या नुकसानीची पाहणी केली. त्यांनी द्राक्षबागा बघितल्या, कांदा, धान इत्यादी पिकांची परिस्थिती बघून ते काही निर्णयाप्रत आलेले आहेत. कोणतेही राज्य सरकार शेतक-यांना शंभर टक्के नुकसान भरपाई देऊ शकलेले नाही. अशा प्रकारचे नैसर्गिक संकट आल्यानंतर जे काही नुकसान होते त्यावेळी शेतकरी पुन्हा उभा राहावा, त्याला पुन्हा आपली शेतीवाडी करता यावी यासाठी आपण त्याला मदत करतो. आपण चर्चा कशासाठी मागतोय ? मराठवाड्यातील सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल, कोकणातील सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम, रायगड जिल्ह्यातील सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील तसेच विदर्भातील सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर हे आपापल्या भागाचे प्रतिनिधित्व करतात त्याप्रमाणे या सभागृहातील अनेक मान्यवर राज्याच्या विविध भागाचे प्रतिनिधित्व करतात. ते जरुर प्रशासनाकडून माहिती घेत असतात. प्रसंगी फिल्डवर काम करतात. प्रशासनातील सक्रेटरी हे फिल्डवर काम करीत नाहीत. पण जिल्हाधिकारी आणि अन्य अधिकारी हे फिल्डवर जाऊन काम करतात. सन्माननीय सदस्य देखील फिल्डवर जाऊन काम करतात. आम्ही शेतक-यांना मदत करण्याचा निर्णय घेतलेला आहे. परंतु त्यामध्ये त्रुटी राहिल्या तर त्या पुन्हा दुरुस्त कराव्या लागतील. हे असे होऊ नये म्हणून ज्यांना शेतीवाडीचा चांगला अनुभव आहे अशा सन्माननीय सदस्यांकडून सूचना घ्याव्यात अशा प्रकारचा विचार राज्यकर्ते म्हणून आम्ही करीत आहोत. सुदैवाने माझ्याकडे अर्थखाते देखील आहे.

मी या सभागृहाला सांगू इच्छितो की, मागच्या काळामध्ये शेतक-यांना जी काही मदत केली गेली त्याबाबतीत एक गोष्ट आमच्याकडून राहून गेली ती म्हणजे राज्यातील शेतक-यांना मागच्या दोन-तीन वर्षाचे पैसे पूर्णपणे मिळालेले नाहीत, हे मी मान्य करतो. पण मी सभागृहाला शब्द देतो की, येणा-या मार्चच्या अधिवेशनाच्या आत, यंदाचे आर्थिक वर्ष संपण्याच्या आत, शेतक-यांना जे 250 कोटी रुपये देणे बाकी आहे ते शंभर टक्के पैसे शेतक-यांना दिले जातील. त्याचप्रमाणे आज देखील चर्चा करुन जो काही निर्णय राज्य सरकार घेईल त्याबाबतीत एकच सांगू इच्छितो की केन्द्र सरकारचे आणि राज्य सरकारचे जे स्थायी नॉर्म आहेत, जे स्थायी आदेश आहेत त्या आदेशापेक्षाही जास्त रक्कम आज महाराष्ट्रातील शेतक-यांना दिली गेली पाहिजे या मताचे लोकशाही आघाडीचे सरकार आहे. त्यामुळे स्थायी आदेशावरच आम्ही गप्प बसलो नाहीत.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार...

आम्हाला माहीत आहे की, स्थायी आदेशामध्ये तुटपुंजी मदत आहे त्यापेक्षा जास्त मदत शेतक-यांना द्यावयाची आहे. ही मदत देत असताना, केवळ घोषणा केल्या गेल्या, शेतक-यांना पैसे मिळाले नाहीत, अशा प्रकारचे आरोप सत्ताधारी पक्षाच्या किंवा विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांवर आणि सरकारवर होता कामा नयेत. ज्या ज्या सूचना या सभागृहामध्ये केल्या जातील त्याप्रमाणे राज्य सरकार निर्णय घेईल. आता सप्लीमेंटरी बजेटमध्ये तरतूद नाही. वेळ पडली तर सीएफ ॲडव्हान्स काढून राज्यातील अवकाळी पावसामध्ये अडकलेल्या शेतक-याला आणि उद्ध्वस्त झालेल्या शेतक-याला पुन्हा उभे करण्याचा निर्णय घेऊ. सभापती महोदय, माझी आपल्या मार्फत विरोधी पक्षाला विनंती आहे की, त्यांनी चर्चेला सुरुवात करावी. चर्चेच्या माध्यमातून शासनाची भूमिका सांगण्याचे काम शासनातर्फे केले जाईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : वीज कनेक्शनच्या संदर्भात माननीय उपमुख्यमंत्र्यांनी खुलासा करावा.

सभापती : आज नियम 289 अन्वये 2 प्रस्ताव मांडले गेले. त्यासंबंधी मी खरे तर कालच प्रश्नोत्तराचा तास सुरु होण्यापूर्वी निर्णय दिला होता. यानुषंगाने माझे ठाम मत असे आहे की, या विषयाच्या संदर्भात काल जे नियम 289 अन्वये तीन प्रस्ताव प्राप्त झाले होते त्या संदर्भात विरोधी पक्षाने आपल्या तीव्र भावना या ठिकाणी व्यक्त केल्या. सत्तारुढ पक्षाने देखील आपल्या तीव्र भावना याठिकाणी व्यक्त केल्या. महाराष्ट्रामध्ये निर्माण झालेली ही परिस्थिती आहे. अवकाळी पावसामुळे शेतक-यांचे जे अतोनात नुकसान झाले आहे त्यासंबंधीची सखोल चर्चा या सभागृहामध्ये झाली पाहिजे. म्हणून कालचे संपूर्ण कामकाज अपवाद म्हणून आपण तहकूब केले होते. आज देखील नियम 289 अन्वये प्रस्ताव दिल्यानंतर आणि सभागृह काही मिनिटासाठी तहकूब केल्यानंतर विरोधी पक्ष आणि सत्तारुढ पक्ष यांच्यामध्ये जी चर्चा झाली त्या प्रमाणे मी त्यांना परवानगी दिली होती आणि तोच माझा निर्णय कायम आहे.

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

...नंतर श्री. भोगले...

सभापती.....

काल नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा घेण्यास मी परवानगी दिली होती. सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, रामदास कदम, विनोद तावडे, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.संजय केळकर, डॉ.दीपक सावंत, सर्वश्री चंद्रकांत पाटील, किरण पावसकर, श्रीमती शोभाताई फडणवीस, सर्वश्री परशुराम उपरकर, जयंत प्र.पाटील यांचा जो नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चेचा प्रस्ताव आहे त्यावर आज सभागृहात चर्चा झाली पाहिजे. खरे तर कालच या प्रस्तावावर चर्चा होणे आवश्यक होते. सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांनी या ठिकाणी शासनाची भूमिका मांडली आहे. आज या प्रस्तावावर चर्चा होणे क्रमप्राप्त आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने ही चर्चा होणे गरजेचे आहे. दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी या चर्चेमध्ये मोठया प्रमाणात भाग घेणे आवश्यक आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ही चर्चा केव्हा घेण्यात येणार आहे?

सभापती : प्रथम सायटेशनचे कामकाज पूर्ण करुन घेऊ. दुपारी 2.00 वाजता चर्चेला सुरुवात होईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राष्ट्रकुल व आशियाई क्रीडा स्पर्धांमध्ये महाराष्ट्राच्या गुणी क्रीडापटूंनी दैदिप्यमान यश संपादन करुन पदके प्राप्त केल्याबद्दल क्रीडापटूंचे अभिनंदन

मु.शी.: राष्ट्रकुल व आशियाई क्रीडा स्पर्धांमध्ये महाराष्ट्राच्या गुणी क्रीडापटूंनी दैदिप्यमान यश संपादन करुन पदके प्राप्त केल्याबद्दल अभिनंदनपर प्रस्ताव

सभापती : सन 2010 मध्ये पार पडलेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांमध्ये व आशियाई क्रीडा स्पर्धांमध्ये पदक विजेत्या महाराष्ट्राच्या क्रीडापटूंचा अभिनंदनपर प्रस्ताव :-

"नवी दिल्ली येथे ऑक्टोबर 2010 मध्ये झालेल्या 19 व्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांमध्ये नेमबाजपटू श्रीमती राही सरनोबत, अनिसा सय्यद, तेजस्विनी सावंत व सुमा शिरुर, कुस्तीगीर श्री.नरसिंग यादव, धावपटू श्रीमती कविता राऊत, टेबलटेनिसपटू श्रीमती मधुरिका पाटकर व ममता प्रभू, हॉकीपटू सर्वश्री विक्रम पिल्ले, गुरुबाज सिंग, शिवेंद्र सिंग व धनंजय महाडिक, बॅडमिंटनपटू श्रीमती आदिती मुटाटकर यांचे तसेच, चीनमध्ये झालेल्या 16 व्या आशियाई क्रीडा स्पर्धांमध्ये जलतरणपटू श्री.विरधवल खाडे, धावपटू श्रीमती कविता राऊत व सुधा सिंग, कबड्डीपटू श्री.नितीन घुले, श्रीमती दिपीका जोसेफ व स्नेहल साळुंखे, हॉकीपटू सर्वश्री विक्रम पिल्ले, धनंजय महाडिक, गुरुबाज सिंग व शिवेंद्र सिंग, स्नूकरपटू श्री.आदित्य मेहता व यासिन मर्चंट, यॉटिंगपटू सर्वश्री फारुक तारापोर, अतुल सिन्हा व तृणाल येलेगावकर या महाराष्ट्राच्या गुणी क्रीडापटूंनी दैदीप्यमान यश संपादून पदके प्राप्त केल्याबद्दल हे सभागृह या सर्व क्रीडापटूंचे हार्दिक अभिनंदन करीत आहे."

प्रस्ताव सर्वानुमते संमत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.राजेंद्र गावीत (कामगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने इचलकरंजी माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, इचलकरंजी यांचा सन 2004-2005, 2005-2006, 2006-2007 व 2007-2008 चा अनुक्रमे बारावा, तेरावा, चौदावा व पंधरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री.राजेंद्र गावीत : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कोल्हापूर जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, कोल्हापूर यांचे सन 2004-2005 व 2005-2006 चे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री.राजेंद्र गावीत : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कापूस बाजार कामगार मंडळ, बृहन्मुंबई, ठाणे व रायगड जिल्हयाकरिता यांचा सन 2007-2008 व 2008-2009 चा छत्तीसावा व सदतीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री.राजेंद्र गावीत : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नाशिक जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ (लासलगांव) यांचा सन 2008-2009 चा विसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

नंतर एल.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र गावित (कामगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने औरंगाबाद माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, औरंगाबाद यांचा सन 2008-09 व 2009-10 चा अनुक्रमे सतरावा व अठरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री. राजेंद्र गावित : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने जालना जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, जालना यांचा सन 2009-10 चा एकविसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. राजेंद्र गावित : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने चंद्रपूर व गडचिरोली जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, चंद्रपूर यांचा सन 2005-06 व सन 2006-07 चा अनुक्रमे पहिला व दुसरा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री. राजेंद्र गावित : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने दि खोका मेकींग ॲण्ड टिंबर मार्केट लेबर बोर्ड, मुंबई यांचा सन 2008-09 चा छत्तीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. राजेंद्र गावित : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, रायगड (रायगड जिल्ह्याकरिता) यांचा सन 2002-03, 2003-04, 2004-05, 2005-06, 2006-07 व 2007-08 चा अनुक्रमे प्रथम द्वितीय, तृतीय, चतुर्थ, पाचवा व सहावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र गावित : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने औरंगाबाद जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, औरंगाबाद यांचा सनप 2008-09 व 2009-10 चा अनुक्रमे सातवा व आठवा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री. दिवाकर रावते : सन 2002-03 चा अहवाल सन 2010 मध्ये ठेवण्यात येत आहे याचे कारण माननीय मंत्री महोदयांनी सांगावे.

सभापती : माननीय मंत्री महोदयांनी या बाबीची नोंद घ्यावी.

श्री. राजेंद्र गावित : सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेची नोंद घेण्यात आली आहे.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: विधेयकांना संमती व अधिसंमती

सभापती : दोन्ही सभागृहाद्वारे पारित केलेल्या विधेयकांना राज्यपाल व राष्ट्रपती यांची अधिसंमती मिळाल्याची यादी प्रधान सचिव वाचून दाखवतील.

सह सचिव : खालील विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाली :--

(प्रेस : येथे सोबत जोडलेली विधेयकांची यादी छापावी.)

....4.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वयेच्या सूचना

सभापती : सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत पाटील, परशुराम उपरकर, किरण पावसकर यांनी "रायगड व सिंधुदुर्ग जिल्ह्यात लेप्टो रोगाने मृत्यूमुखी पडलेल्यांची संख्या मोठ्या प्रमाणात असून या महाभयंकर रोगाला अटकाव करण्यासाठी आरोग्य यंत्रणेला आलेले अपयश" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "मुंबई येथील पवई परिसरात राहणाऱ्या एका अल्पवयीन मुलीवर गेल्या 9 वर्षांपासून बलात्कार होत असल्याची घटना दि. 11.11.2010 रोजीच्या सुमारास उघडकीस येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "एटापल्ली तालुक्यातील (जि. गडचिरोली) जाराबंडी येथे दिनांक 21.11.2010 रोजी वा त्यासुमारास नाटक संपल्यावर नाट्यमंडपाच्या शेजारी असलेल्या चहा टपरीवर चहा पीत असलेल्या श्री. चंदू पेयल्ल या पोलीस जवानास नक्षलवाद्यांनी नावाने जवळ बोलावून त्याच्यावर गोळी घालून ठार मारल्याची घटना घडणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री किशनचंद तनवाणी, परशुराम उपरकर यांनी "सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वैभववाडी तालुक्यातील आखवणे गावात धाकूबाई देवराई येथे महसूल खात्याची 10 एकर जमीन असून या जमिनीत 934 झाडे असून ही सर्व झाडे लिलावात विकण्याचा निर्णय महसूल खात्याने घेतल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

.....5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती.....

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत, यांनी "मुंबई येथील अधेरी (पूर्व) भागातील झोपडपट्टी पुनर्विकास योजनेअंतर्गत दुर्वांकूर सहकारी गृहनिर्माण संस्थेची उभारणी करण्यात येणे, 10 झोपडपट्टी धारकांपैकी 7 जणांना गेल्या आठवड्यात सात दिवसांची नोटीस झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातर्फे देण्यात येणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती.....

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री केशवराव मानकर, पांडुरंग फुंडकर, शोभा फडणवीस, संजय केळकर यांनी "गोंदिया जिल्हयातील नवेगांवबांध या स्थळाला सन 1975 मध्ये राष्ट्रीय उद्यानाचा दर्जा बहाल करण्यात आला असून नंतर सदर क्षेत्र संरक्षित वनामध्ये मोडणे, त्यामुळे या उद्यानालगत असलेल्या कवलेवाडा, कालीमाटी, झनकारगोंदी, मलकाझरी तुमडीमेंढा या 880 च्या घरात लोकसंख्या असलेल्या पाच गावांचे पुनर्वसन करण्याचा प्रश्न निर्माण होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री धनंजय मुंडे, पाशा पटेल, संजय केळकर यांनी "ऊसतोड ठेकेदार श्री. हरिश्चंद्र साहेबराव राख, रा. लिंबारुई, जि. बीड यांचे नवगण राजूरी येथून अपहरण होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी "खामगाव तालुक्यातील (जि.बुलढाणा) लांजूड येथे दिनांक 27 नोव्हेंबर, 2010 रोजी महाराष्ट्र विद्या प्रसारक मंडळाद्वारा संचलित, महाराष्ट्र विद्यालयातील इयत्ता 5 वी ते 8 ती पर्यंतच्या 102 विद्यार्थ्यांना पोषण आहारांतर्गत वाटप झालेल्या खिचडीत साप शिजल्याने व ही खिचडी खाल्ल्याने विद्यार्थ्यांना विषबाधा होणे या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जगदिश गुप्ता, पांडुरंग फुंडकर यांनी "बुलढाणा जिल्हयातील नांदूरा येथे दिनांक 8 मे, 2010 रोजी श्री हरिभाऊ खंडूजी सातव यांनी महात्मा फुले बिगरशेती सहकारी पतसंस्थेचे व्यवस्थापक श्री.अजय महाजन व सचिव श्री.लक्ष्मण महाजन यांनी पतसंस्थेचे अध्यक्ष व संचालक यांना अंधारात ठेऊन सुमारे 50 ते 60 लाख रुपयांचा गैरव्यवहार करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती...

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी "पोटनिवडणुकीच्या कामासाठी मतदार याद्या तयार करण्याचे प्राथमिक शिक्षकांना काम देणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

अन्य सूचनांना मी दालनातच अनुमती नाकारलेली आहे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अल्पकालीन चर्चेबाबत

सभापती : नियम 97 अन्वये अवकाळी पावसाच्या संदर्भातील अल्पकालीन चर्चेला दुपारी 2.00 वाजता सुरुवात होणार आहे. मधल्या कालावधीत आजच्या कामकाजात दर्शविलेल्या लक्षवेधी सूचनांवरील चर्चेस सुरुवात करावी, असे मला वाटते.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक 4 बाबत

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आजच्या कामकाजात चौथ्या क्रमांकाची लक्षवेधी सूचना रायगड जिल्हयातील पेण अर्बन सहकारी बँकेच्या संदर्भातील आहे. या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात सविस्तर चर्चा होणे आवश्यक आहे. या बँकेत साडेतीन हजार कोटींचा घोटाळा झालेला असून 400 कोटी रुपये या बँकेने चुकीच्या पध्दतीने वितरित केले आहेत. या बँकेत मोठा घोटाळा झालेला असल्यामुळे ही बँक दिवाळखोरीत निघाली आहे. या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात शासनाकडे अपूरी माहिती आहे. या विषयाची व्याप्ती मोठी असल्यामुळे ही लक्षवेधी सूचना पुढे ढकलावी, अशी माझी आपणास नम्र विनंती आहे.

सभापती : ठीक आहे. सदर लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात येत आहे.

श्री.प्रकाश सोळंके : अध्यक्ष महोदय, रायगड जिल्हयातील पेण अर्बन सहकारी बँकेच्या संदर्भात सविस्तर उत्तर देण्याची शासनाची तयारी असून याबाबतची संपूर्ण माहिती माझ्याकडे उपलब्ध आहे. त्यामुळे या लक्षवेधी सूचनेवरील चर्चा पुढे न ढकलता ती आजच घेण्यात यावी, अशी माझी विनंती आहे.

सभापती : कामकाज पत्रिकेत दर्शविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचनांपैकी एखादी लक्षवेधी सूचना पुढे ढकलावी, अशाप्रकारची विनंती माननीय मंत्री महोदय ज्यावेळी करतात त्यावेळी ती विनंती आपण मान्य करतो. त्यामुळे सन्माननीय सदस्यांची विनंती देखील मान्य करण्यास हरकत नाही. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी विनंती केल्याप्रमाणे ही लक्षवेधी सूचना मी पुढे ढकलीत आहे.

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

म.वि.स.नियम 93 च्या सूचनांवरील निवेदनांबाबत

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, नियम 93 च्या सूचनांवरील निवेदने शासनाकडून सत्रकाळाच्या शेवटच्या दिवशी पटलावर ठेवली जातात, असा अनुभव आहे. ही निवेदने तातडीने सभागृहाच्या पटलावर आली पाहिजेत, अशी माझी मागणी आहे.

सभापती : सदर निवेदने तातडीने सभागृहाच्या पटलावर ठेवण्याबाबत मी शासनाला सूचना करतो.

यानंतर श्री. अजित....

या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>लक्षवेधी क्रमांक 1, 2 व 3 बाबत</u>

सभापती : आजच्या कामकाजपत्रिकेत दाखविण्यात आलेल्या लक्षवेधी क्रमांक 1, 2 व 3 च्या विषयासंबंधातील माननीय मंत्रिमहोदय सभागृहात उपस्थित नसल्यामुळे त्या लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात येत आहेत. या लक्षवेधी सूचना नंतर प्रत्येक दिवसाच्या कामकाजात एकेक या प्रमाणे दाखविण्यात येतील.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत असून सभागृहाची बैठक दुपारी 2.00 वाजता पुन: भरेल. दुपारी 2.00 वाजता "राज्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान" या विषयावरील अल्पकालीन चर्चेस सुरुवात होईल.

(सभागृहाची बैठक दुपारी 2 वाजून 21 मिनिटांनी दुपारी 2.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगिती नंतर)

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

पृ.शी. : राज्यात अतिवृष्टी व अवकाळी पावसामुळे शेतपिकांचे झालेले नुकसान

मु.शी. : राज्यात अतिवृष्टी व अवकाळी पावसामुळे शेतपिकांचे झालेले नुकसान या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, रामदास कदम, विनोद तावडे, डॉ.नीलम गो-हे, श्री.संजय केळकर डॉ.दीपक सावंत,सर्वश्री चंद्रकांत पाटील,किरण पावसकर, श्रीमती शोभाताई फडणवीस, सर्वश्री परशुराम उपरकर,जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

उप सभापती : आता अल्पकालीन चर्चेला सुरुवात करु या.

श्री.पांडुरंग फुंडकर: सभापती महोदय,मघाशी माननीय उपमुख्यमंत्री श्री.अजित दादा पवार यांनी उत्तर दिले होते परंतु त्यावेळी मला बोलण्याची संधी दिली गेली नाही. शेतक-यांना मागच्या पॅकेजचे जे 250 कोटी रुपये द्यावयाचे होते ते 31 मार्चच्या आत देण्यात येतील असे माननीय उपमुख्यमंत्र्यांनी सभागृहाला आश्वासन दिले होते. राज्यातील शेतक-यांना त्यांनी चांगला संदेश दिला आहे. एका बाजूला अतिवृष्टीवरील चर्चा या ठिकाणी मान्य केली होती परंतु राज्यात विजेचा देखील प्रश्न आहे. सध्या विदर्भामध्ये अधिवेशन सुरु असतांना बुलढाणा जिल्हयात 49 हजार 991, अकोला जिल्हयात 2 हजार 113, वाशिम जिल्हयात 18 हजार 261, यवतमाळ जिल्हयात 24 हजार 932, अमरावती 14 हजार 725 आणि वर्धा जिल्हयात 6 हजार 325 अशा एकूण

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

1 लाख 16 हजार 347 शेतक-यांची विजेची कनेक्शन तोडण्यात आलेली आहेत. अतिवृष्टी आणि अवकाळी पावसामध्ये सापडलेले हे शेतकरी आहेत त्यामुळे या शेतक-यांचा पुन्हा सर्व्हे करण्याची गरज नाही किंवा त्यांची पुन्हा तपासणी करण्याचीही गरज नाही. त्यासंबधीची आकडेवारी शासनाकडे आलेली आहे. आमची अशी मागणी आहे की,शेतक-यांच्या मागच्या पॅकेजचे पैसे देण्याच्या बाबतीत मघाशी जसे सांगितले होते त्याप्रमाणे विदर्भातील आत्महत्याग्रस्त सहा जिल्हयातील एक लाख शेतक-यांची विजेची कनेक्शन ताबडतोब जोडली जातील आणि अतिवृष्टीच्या संकटात सापडलेल्या शे्तक-यांची विजेची कनेक्शन तोडली जाणार नाहीत.

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

या दोन गोष्टींबाबत सभागृहाला आश्वासित करावे आणि त्यानंतर चर्चेला सुरुवात करावी.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर साहेबांनी याठिकाणी एक मुद्दा उपस्थित केला आहे. माझी सन्माननीय विरोधी पक्षनेते व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, मी आपणावर हेतूपुरस्सर आरोप करीत आहे अशाप्रकारचा आपण गैरसमज करुन घेऊ नये. सभापती महोदय, या अत्यंत महत्वाच्या प्रस्तावावर चर्चा करण्याची या राज्य सरकारची, सत्ताधारी पक्षाची काल तयारी होती आणि आज देखील तयारी आहे. याठिकाणी सन्माननीय विरोधी पक्षनेते व सन्माननीय सदस्य सर्वश्री. दिवाकर रावते, जयंत प्र. पाटील यांनी उपस्थित केलेल्या मुध्यांच्या संदर्भात सांगू इच्छितो की, मागील जी देणे रक्कम राहिली होती त्याबद्दल सरकारने आपली भूमिका स्पष्टपणे मांडली आहे. आता पुन्हा नवीन नवीन मुद्दे उपस्थित होत आहेत. माझे असे म्हणणे आहे की, चर्चेला...

(गोंधळ)

(विरोधी पक्षाकडील अनेक माननीय सदस्य उभे राहून एकाच वेळी बोलू लागतात.)

सभापती महोदय, आता सभागृहापुढे अवकाळी पावसामुळे व अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीच्या संदर्भातील प्रस्ताव चर्चेकरिता आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आता शेतकऱ्यांच्या वीजेच्या तोडलेल्या कनेक्शनसंबंधी याठिकाणी मुद्दा मांडला आहे. माझे याबाबतीत स्पष्ट मत आहे, कदाचित ते चुकीचे सुध्दा असू शकेल. परंतु या सभागृहामध्ये असलेल्या प्रस्तावावर कोणत्याही प्रकारे चर्चा न करता वेगळे मुद्दे उपस्थित करावयाचे आणि सभागृहाचे कामकाज चालू द्यावयाचे नाही. या प्रस्तावावर सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना देखील आपली भूमिका मांडावयाची आहे...

(गोंधळ)

सभापती महोदय, या सभागृहापुढे असलेल्या प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात करुन त्या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्यांनी आपले मुद्दे मांडावेत. त्या संदर्भात उत्तराच्या भाषणामध्ये शासनाचे जे काही मत आहे ते आम्ही मांडू.

(दोन्ही बाजूकडील अनेक माननीय सदस्य एकाचवेळी बोलू लागतात.)

उपसभापती : माननीय सदस्यांनी 2 मिनिटे शांतपणे बसावे.

(दोन्ही बाजूकडील माननीय सदस्य घोषणा देतात.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाकडील काही माननीय सदस्य "वेल"मध्ये उभे राहून घोषणा देतात.)

उपसभापती : माननीय सदस्यांनी आपापल्या जागेवर जाऊन बसावे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, दादांनी आमच्यावर आरोप केले आहेत...

उपसभापती : आपल्याला माझे ऐकावयाचे नाही काय?

(विरोधी पक्षाकडील काही माननीय सदस्य "वेल"मध्ये उभे राहून घोषणा देतात.)

उपसभापती : मी सभागृहाचे कामकाज दहा मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 2 वाजून 08 मिनिटांनी 10 मिनिटांकरिता स्थगित झाली.)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

सभापतीस्थानी - माननीय उपसभापती

(माननीय उप सभापती आसनस्थ होताच अनेक सन्माननीय सदस्य घोषणा देतात.)

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय सभापती यांनी ज्यावेळेला सदरहू विषयावर नियम 289 खाली चर्चा कशी करता येऊ शकते हे सांगण्यासाठी मला परवानगी दिली, तेव्हा माननीय उर्जा मंत्री सभागृहामध्ये उपस्थित नव्हते.मी त्यावेळी या विषयाच्या अनुषंगाने बोलत असताना प्रामुख्याने विजेच्या संदर्भात मुद्दा मांडला होता.अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे जे नुकसान झालेले आहे,त्याबाबतीत पंचनामे करण्यासाठी प्रोसीजर सुरु केली जाणार आहे.पण वीज तोडणीमुळे आत्महत्याग्रस्त झालेल्या या विदर्भामध्ये अधिवेशन होत आहे. आत्महत्याग्रस्त झालेल्या विदर्भामधील 6 जिल्ह्यातील 1 लाखाच्यावर विजेची कनेक्शन तोडण्यात आली आहेत. येथील विजेची थकबाकी 600 ते 700 कोटी रुपयांची असेल. पण मी मघाशी उल्लेख केल्याप्रमाणे आपल्याच राज्यातील एका सिंचन सोसायटीकडे 2200 कोटी रुपयांची थकबाकी आहे.पण त्यांचे कनेक्शन तोडले जात नाही. मात्र विदर्भातील आत्महत्याग्रस्त झालेल्या शेतकऱ्यांच्या विजेची कनेक्शन तोडली जात आहेत.मागील दोन दिवसामध्ये दहा आत्महत्या झाल्या आहेत.त्यासाठी फार काही सर्व्हे करावा लागणार नाही.अशा वेळी माननीय मंत्री महोदयांनी तातडीने घोषणा केली पाहिजे की, जी विजेची कनेक्शन तोडण्यात आली आहेत, ती जोडली जातील आणि यापुढे पुन्हा अल्प-भूधारक शेतकऱ्यांची विजेची कनेक्शन तोडली जाणार नाहीत एवढेच आमचे म्हणणे आहे. त्यानंतर आपल्याला या विषयाच्या अनुषंगाने चर्चा करता येईल.पण वीज तोडणी आणि वीज जोडणी या दोन्ही गोष्टींबाबत आमची आग्रही मागणी आहे.शासन या विदर्भामध्ये आणखी किती शेतकऱ्यांच्या आत्महत्या होऊ देणार आहे? कारण अजूनही आत्महत्येचे सत्र सुरु आहे.

श्री.माणिकराव ठाकरे: सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.....

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांना सांगू इच्छितो की, मला माझा मुद्दा पूर्ण करु द्यावा. कारण मी यापूर्वी जेव्हा मुद्दा मांडला होता, तेव्हा माननीय उर्जा मंत्री श्री.अजितदादा पवार सदनामध्ये उपस्थित नव्हते.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, ...

श्री.पांडु रंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी....

.....क्यु-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

माझे म्हणणे ऐकून घ्यावे. मी त्यांना असे विचारु इच्छितो की, शासनाने अशा प्रकारे शेतकऱ्यांची वीज तोडणे मान्य आहे काय ?

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य माननीय उप सभापतींच्या आसनासमोर जाऊन घोषणा देतात.)

उपसभापती : सन्माननीय सदस्यांनी आपापल्या जागेवर जावे.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, मी याठिकाणी सांगितल्यानंतर सदरहू प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरु करणार काय ?

काही सन्माननीय सदस्य : होय.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मी जो हरकतीचा मुद्दा उपस्थित केला होता, त्याचे काय झाले ?

उपसभापती : मी मघाशी याठिकाणी सन्माननीय सदस्यांना शांत रहावयास सांगितल्यानंतर माननीय उप मुख्यमंत्री यांना बोलण्यासाठी परवानगी दिलेली आहे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, माझाही हरकतीचा मुद्दा आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंगजी फुंडकर यांनी याठिकाणी कोणत्या विषयावर बोलावयास सुरुवात केली आहे हे आम्हाला कळले पाहिजे. एकतर काल नियम 289 खाली देण्यात आलेल्या प्रस्तावावरील चर्चा सुरु केल्यानंतर, आज सुध्दा माननीय विरोधी पक्षनेते मध्ये-मध्ये उभे राहून काही विषय मांडत आहेत. आमचे एकच म्हणणे आहे की, या विषयाच्या अनुषंगाने एकदा सविस्तर चर्चा पूर्ण होऊ द्यावी, त्यानंतर माननीय मंत्री महोदय सविस्तर उत्तर देतील.

यानंतर श्री.बरवड . . . .

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे ...

मध्येच कोणता तरी प्रश्न निर्माण करावयाचा आणि तेवढ्यापुरतेच उत्तर मागावयाचे ही प्रथा बरोबर नाही. ज्यावेळी आपण चर्चेला परवानगी देणार त्यावेळी सन्माननीय सदस्यांनी बोलावे. अशा पध्दतीने मध्येच बोलणे बरोबर नाही. या विषयाच्या संदर्भात सर्व सन्माननीय सदस्यांच्या ज्या भावना आहेत त्या त्यांना मांडू द्याव्यात आणि या विषयावर चर्चा करावी. मध्येच उभे राहून आपल्या मनाप्रमाणे बोलावयाचे आणि माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर द्यावयाचे ही पध्दत बरोबर आहे काय ?

श्री. पांडुरंग फुंडकर : मी ज्यावेळी सभागृहामध्ये विषय उपस्थित केला त्यावेळी माननीय उपमुख्यमंत्री सभागृहात उपस्थित नव्हते. सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांना सांगू इच्छितो की, हा मनाप्रमाणे बोलण्याचा विषय नाही. आम्ही मनाप्रमाणे बोलत नाही.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते आणि दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी विजेच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केलेला आहे. त्या मुद्दयाला अनुसरुन मला सभागृहाला एक माहिती द्यावयाची आहे. आपल्या राज्यात मराठवाडा, विदर्भ, खानदेश, पश्चिम महाराष्ट्र, कोकण असे जे वेगवेगळे विभाग आहेत त्यामध्ये 28 लाख 97 हजार 605 एवढे वीज कनेक्शन आपण शेतकऱ्यांना दिलेले आहेत. म्हणजे तेवढे शेतकरी शेती पंपाचे वीज ग्राहक आहेत. यासंदर्भात आपण दुसरा एक निर्णय घेतला. या वर्षी पाऊस चांगला झालेला असल्यामुळे शेतकरी नवीन विहिरी घेतात. वेगवेगळ्या ठिकाणी ओढे,नाले, कॅनॉल तसेच धरणामध्ये पाणी असल्यामुळे मागेल त्याला वीज देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतलेला आहे. 2 लाख शेतकऱ्यांना विजेचे कनेक्शन द्यावयाचे आहेत. एक वीज कनेक्शन देण्याकरिता राज्य सरकारला दीड लाख रुपये खर्च येतो. राज्य सरकार शेतकऱ्यांना विजेचे कनेक्शन देण्याकरिता 3 हजार कोटी रुपये खर्च करीत आहे. मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, हे अधिवेशन विदर्भामध्ये होत आहे. सत्ताधारी पक्षाच्या म्हणजे काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सर्वांनीच अशी आग्रही मागणी केली की, विदर्भामध्ये जेवढे पेडपेंडींग अर्ज आहेत त्यांना ताबडतोब वीज कनेक्शन द्यावे. त्याबाबतचाही निर्णय मी जाहीर करतो की, विदर्भात जे पेडपेंडींग अर्ज आहेत त्यांना तातडीने विजेचे कनेक्शन दिले जातील. शेतकऱ्यांचा तोही प्रश्न आपण घेतला. जे 23 लाख 31 हजार 695 थकबाकीदार आहेत त्यांच्याकडे 5688 कोटी 45 लाख रुपयांची थकबाकी आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MMP/

श्री. अजित पवार ....

ज्या मुळा-प्रवरा सोसायटीचा उल्लेख केला त्याचा यामध्ये समावेश नाही. ते 2200 कोटी रुपये वेगळे आहेत. त्यासंदर्भात एमईआरसीकडे हिअरींग चालू आहे. राज्य सरकारने, ऊर्जा विभागाने यासंदर्भात कठोर भूमिका घेतलेली आहे. इतरांना जो न्याय तोच न्याय त्या सोसायटीला सुध्दा दिला गेला पाहिजे ही राज्य सरकारची भूमिका आहे. त्यामुळे 23 लाख 31 हजार 695 थकबाकीदारांकडे जी 5688 कोटी रुपयांची थकबाकी आहे त्यासंदर्भात मी राज्य सरकारच्या वतीने एवढेच सांगू इच्छितो की, ज्यांची चालू बाकी आहे किमान त्याचे तरी पैसे भरावेत, त्यांना ताबडतोब वीज कनेक्शन जोडून देण्यास तयार आहोत. यामध्ये काही ठिकाणी तक्रारी आल्या तसेच सकाळी बरेच सन्माननीय सदस्य माननीय मुख्यमंत्र्यांना भेटले. सन्माननीय सदस्यांना माहीत आहे की, शिरुर तालुक्यामध्ये एका ट्रान्सफार्मरवर 100 कनेक्शन्स आहेत. त्या ठिकाणी 10 लोकांनी पैसे भरले परंतु 90 लोकांनी पैसे भरले नाहीत म्हणून सगळ्यांचे कनेक्शन तोडतात तसे न करता ज्यांनी पैसे भरले आहेत त्यांचे वीज कनेक्शन न तोडता किंवा ट्रान्सफार्मर बंद न करता ज्यांनी पैसे भरले आहेत त्यांचा वीज पुरवठा चालू ठेवावयाचा आणि ज्यांनी पैसे भरले नाहीत त्यांचा वीज पुरवठा थांबवावयाचा अशा पध्दतीचा निर्णय घेण्यास शासन तयार आहे. यामध्ये फक्त 58 कोटी रुपयांची वसुली झालेली आहे.

सभापती महोदय, शेवटी हे सरकार शेतकऱ्यांच्या बाजूचेच आहे. परंतु काही शिस्त देखील आपण स्वत:ला लावून घेतली पाहिजे. अवकाळी पाऊस झालेला आहे, अतिवृष्टी झालेली आहे. त्याकरिता आपण कमी व्याजाने पीक कर्जाचा पुरवठा करतो. 2 टक्के व्याजाने 50 हजार रुपयांपर्यंत किंवा तीन-तीन लाख रुपयांपर्यंत कर्ज पुरवठा सुरु झालेला आहे. त्याकरिता शेतकऱ्यांनी चालू बाकी भरावी. त्यांचे कनेक्शन कोणत्याही परिस्थितीमध्ये तोडले जाणार नाही हा शब्द मी या चर्चेच्या निमित्ताने सभागृहाला देऊ इच्छितो.

श्री. सय्यद पाशा पटेल : चर्चेच्या आधीच जर असे असेल तर चर्चेच्या नंतर काय असणार?

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले की, 5 हजार कोटी रुपयांची थकबाकी आहे. हा आकडा बरोबर आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

सभापती महोदय, शेतकरी सरकारकडे भीक मागत नाही हे जरा लक्षात ठेवावे. शेतकरी आता अडचणीत आहे. शेतक-यांची विजेची बिले माफ करावीत अशी आमची मागणी नाही. शेतकरी सध्या अडचणीत सापडला असल्यामुळे त्याला एक वर्षभर विजेच्या बिलात सवलत द्यावी अशी आमची मागणी आहे. शेतकरी चालू विजेचे बिल सुध्दा भरु शकत नाही. रब्बीचे बियाणे घेण्यासाठी त्यांच्याकडे पैसा नाही. ही वस्तुस्थिती असल्यामुळे ते विजेचे बिल भरु शकत नाही. सरकारने शेतकऱ्यांचे विजेचे बिल माफ करु नये. परंतु लॉंग टर्मपर्यंत विजेच्या बिलाचे हप्ते पाडून आता कनेक्शन्स जोडून द्यावीत. जी कनेक्शन्स तोडली आहेत ती जोडून द्यावीत. मी मघाशी सांगितले होते की, यवतमाळ जिल्हयामध्ये 25 सरपंचांनी त्यांच्या जमिनी सरकारला दान देण्याची घोषणा केली आहे. ती कशासाठी केली आहे ? अतिवृष्टीमुळे शेतकरी आपल्या शेतात बियाणे पेरु शकत नाही अशी स्थिती आहे. म्हणून आमची आग्रहाची मागणी आहे की, किमान जे आत्महत्याग्रस्त जिल्हे आहेत त्या जिल्हयातील शेतक-यांची तोडलेली विजेची कनेक्शन्स जोडून द्यावीत. तसेच वर्षभर खरिपाचे व रब्बीचे पीक त्याच्या घरामध्ये येईपर्यंत विजेचे कनेक्शन तोडू नये, ही आमची मागणी सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांनी मान्य केली पाहिजे, आपण ती मान्य करावी. त्यानंतर आम्ही लगेच चर्चेला सुरुवात करण्यास तयार आहोत.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते आणि काही सन्माननीय सदस्यांनी आज नियम 289 अन्वये प्रस्ताव दिला होता आणि काल देखील तसाच प्रस्ताव दिला होता. त्याबाबत काल बरेच काही झाले होते, त्यावर मी बोलणार नाही.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य बोलत असतात.)

सन्माननीय सदस्यांनी ऐकण्याचे सौजन्य दाखविले पाहिजे. आमचेच ऐकले पाहिजे असे होत नाही. एवढे समोरच्या सन्माननीय सदस्यांनी जरा शिकावे. काल सन्माननीय सभापतींनी अवकाळी पावसासंबंधीची चर्चा घेण्यात येईल असा निर्णय दिला होता, तरीही विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी ऐकले नाही. आज सुध्दा त्यांनी तेच सुरु केले आहे. मघाशी चर्चा झाल्यानंतर सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांनी उत्तर दिल्यावर विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य गप्प बसले. आता काय करावे ते त्यांना कळेनासे झाले. त्यामुळे त्यांनी आता पुन्हा तेच

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

श्री.विनायक मेटे.....

सुरु केले आहे. नाचता येईना अंगण वाकडे अशी परिस्थिती त्यांची झाली आहे. विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी एक तर या विषयाची चर्चा सुरु केली पाहिजे. ते चर्चा सुरु करीत नसतील तर आपण पुढील कामकाज घेण्यास सुरुवात करावी.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी आता कोणता हरकतीचा मुद्दा मांडला ते आपण आम्हाला समजावून सांगावे. सन्माननीय मुख्यमंत्री हे हायटेक आहेत, त्यांनी संसदेत कामकाज केलेले आहे. त्यांनी आम्हाला सन्माननीय सदस्यांच्या म्हणण्यात हरकतीचा कोणता मुद्दा होता ते सांगावे. वास्तविक ते काल सभागृहात उपस्थित नव्हते हे मला माहीत आहे. तरी देखील उगाच बोलून आमच्यावर आरोप करीत आहेत.

उपसभापती : तुम्हाला नीट नाचता येत नाही अशी सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांची हरकत आहे.

श्री.विनोद तावडे : सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांना कशाचा राग आला आहे ते मला माहीत आहे. मंत्र्यांच्या यादीमध्ये त्यांचे नाव समाविष्ट होता होता झाले नाही. परंतु सरकारची बाजू घेण्यासाठी खूप बोलले म्हणजे म्हणजे मंत्री होता येते असे वाटण्याचे कारण नाही. आपण वरिष्ठ सभागृहाचे सन्माननीय सदस्य आहात. सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांना मी विनम्रपणे विनंती करतो. आमची विनंती ते मान्य करतील. कारण ते अतिशय तडफदार नेते आहेत. आपले नेतृत्व फडफडीत आहे. आपण जाणत्या राजाचे जाणते पुतणे आहात. म्हणून मला आशा आहे. शेतकऱ्यांना एक वर्षभर विजेचे बिल भरता येणार नाही हे संवेदनशील सन्माननीय मुख्यमंत्री आणि सन्माननीय उपमुख्यमंत्री समजून घेतील, आपण बळीराजाला न्याय देण्याची घोषणा करावी, त्यानंतर चर्चा सुरु करता येईल.

श्री.अजित पवार : सकाळी माननीय सभापती यांच्या समवेत सभागृहात चर्चा होऊन त्यांनी अवकाळी पावसाची चर्चा वगळता आजच्या कामकाजपत्रिकेवरील उर्वरित कामकाज घेतले होते. त्यावेळी त्यांनी असे जाहीर केले होते की, दुपारी 2 वाजता अवकाळी पावसासंबंधीच्या चर्चेला सुरुवात करण्यात येईल. हा निर्णय आम्ही व सन्माननीय विरोधी पक्ष नेते, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी मान्य केला होता. त्यानुसार माननीय मदत व पुनवर्सन मंत्री डॉ.पतंगराव कदम हे संपूर्ण तयारीनिशी सभागृहात आलेले आहेत.

यानंतर श्री.शिगम

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. अजित पवार...

राज्य सरकारची उत्तर देण्याची तयारी आहे. एवढी तयारी करुन आल्यानंतर पुन्हा काही तरी नवीन मुद्दा विरोधी पक्षाकडून येथे उपस्थित केला जात आहे. मग पुन्हा कुणी तरी निरोप पाठवतो की, विधानसभेचे कामकाज थांबलेले आहे त्यामुळे काही तरी वेगळा मुद्दा उपस्थित करा. मग पुन्हा या ठिकाणी मुद्दा उपस्थित करुन आम्ही जणू काही राज्यातील शेतक-यांच्या हितासाठी सभागृहाचे कामकाज बंद पाडीत आहोत असे शेतक-यांना दाखविले जात आहे. सभापती महोदय, माझे आपल्या मार्फत राज्यातील शेतक-यांना असे सांगणे आहे की, विरोधी पक्षाचे खायचे दात वेगळे आणि दाखवायचे दात वेगळे आहेत. विरोधी पक्ष शेतक-यांच्या प्रश्नाविषयी चर्चा करु इच्छित नाही, तर काही तरी मुद्दा उपस्थित करुन कामकाज बंद पाडायचे आणि सभागृहातून निघून जायचे अशीच विरोधी पक्षाचे भूमिका आहे. विरोधी पक्षाने चर्चेच्या माध्यमातून आपली भूमिका या ठिकाणी मांडावी. चर्चेच्या माध्यमातून जे काही मुद्दे उपस्थित केले जातील त्याला उत्तर देण्याची राज्य शासनाची तयारी आहे. शेतक-यांना समाधान वाटेल अशाच प्रकारचे उत्तर राज्य सरकार देईल.

(सत्ताधारी आणि विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य आपापल्या जागी उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात तर काही सन्माननीय सदस्य जोरजोराने घोषणा देत असतात.)

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मला बोलायचे आहे. पण मला बोलूच दिले जात नाही.

उपसभापती : मी पुढचे कामकाज पुकारीत आहे. तेव्हा सन्माननीय सदस्यांनी शांत रहावे अशी माझी त्यांना विनंती आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : आरोग्य विज्ञान विद्यापीठ (दुसरी सुधारणा) विधेयक

L.C. BILL NO. X OF 2010

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES ACT, 1998.)

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य आपापल्या जागी उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात तर काही सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात.)

श्री. हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्य मंत्री) : सभापती महोदय, सन 2010 चे वि. प. वि. क्रमांक 10, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, 1998 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010चे वि.प. वि. क्रमांक 10 मांडतो.

उपसभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

L.C.BILL NO. XI OF 2010

(A BILL FURTHER TO AMEND THE PAYMENT OF BONUS ACT, 1965 IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.)

श्री. हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्य मंत्री) : सभापती महोदय, सन 2010 चे वि. प. वि. क्रमांक 11, बोनस प्रदान अधिनियम, 1965 महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010चे वि.प.वि. क्रमांक 11 मांडतो.

उपसभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक

L.C.BILL NO. XII OF 2010.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.)

श्री. हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्य मंत्री) : सभापती महोदय, सन 2010 चे वि. प. वि. क्रमांक 12, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010चे वि.प.वि. क्रमांक 12 मांडतो.

उपसभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

(घोषणा)

पृ. शी. : सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक

L.C.BILL NO. XIII OF 2010.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA CO-OPERATIVE SOCITIES ACT, 1960.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्य मंत्री) : सभापती महोदय, सन 2010 चे वि. प. वि. क्रमांक 13, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1960 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010चे वि.प.वि. क्रमांक 13 मांडतो.

उपसभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

(घोषणा)

...6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मुंबईचा शेतांतील पिकांवरील कीड व रोग याबाबत (सुधारणा) विधेयक

L.C. BILL NO. XIV OF 2010

(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY AGRICULTURAL PESTS AND DISEASES ACT, 1947)

श्री. हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्य मंत्री) : सभापती महोदय, सन 2010 चे वि. प. वि. क्रमांक 14, मुंबईचा शेतांतील पिकांवरील कीड व रोग याबाबत अधिनियम, 1947 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010चे वि.प.वि. क्रमांक 14 मांडतो.

उपसभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

...7...

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य आपापल्या जागी उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात तर काही सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या शुक्रवार, दिनांक 3.12.2010 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन: भरेल. सकाळी 11.00 ते दुपारी 12.30 वाजेपर्यंत विशेष बैठक होईल. त्या बैठकीत शासकीय विधेयक घेण्यात येईल. त्यानंतर दुपारी 1.00 वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 2 वाजून 38 मिनिटांनी शुक्रवार, दिनांक 3.12.2010 रोजीच्या सकाळी 11.00 वाजेपर्यन्त स्थगित झाली.)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही